# आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२६४००६३/६५
०२२ – २२७१ ७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

'आरोग्य भवन', ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.


राग्राआअ/शाआत/राबास्वाका/७६१४६-४४९/२०१२.१३
दिनांक – २३ फेब्रुवारी, २०१३

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,
सर्व (ठाणे जिल्हा वगळून)

**विषय – राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत भरतीबाबतच्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचना.**

संदर्भ – या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दिनांक २२/२/२०१३ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत भरतीबाबतच्या मार्गदर्शक सूचना आपणास दिनांक २२/२/२०१३ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याबाबतच्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. दिनांक २४ फेब्रुवारी, २०१३ च्या वर्तमानपत्रात मुलाखतीच्या कार्यवाहीबाबत विस्तृतपणे माहिती देणारी जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्या सूचना आपल्या सूचना फलकावर व मुलाखतीच्या ठिकाणी सर्व उमेदवारांना दिसतील अशा पध्दतीने लावण्यात याव्यात. (या जाहीर सूचनेची प्रत सोबत जोडण्यात येत आहे)

२. मुलाखत सुरु होण्यापूर्वी, छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना –
   - पदांनुसार पदवी/पदविका/ANM कोर्स परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी लावण्यात येणाऱ्या गुणांच्या कट ऑफच्या पध्दतीबद्दल माहिती द्यावी.
   - मुलाखतीमध्ये दिल्या जाणाऱ्या गुणांकनांची पध्दत समजवून सांगण्यात यावी.

३. मुलाखतीमध्ये द्यावयाच्या गुणपत्रकाचे प्रारुप या पत्रासोबत जोडण्यात आले आहे. त्या **प्रारुपाप्रमाणेच** मुलाखतीच्या वेळी गुण देण्यात येऊन अंतिम निवड यादी लावताना या **गुणपत्रकातच** निकाल जाहीर करावा.

४. मुलाखतीचा निकाल त्याच दिवशी जाहीर करण्यात यावा व या कार्यालयास त्याची प्रत न चुकता त्याच दिवशी तात्काळ mdnrhm.mumbai@gmail.com , spm.pune@gmail.com , shpnrhm@gmail.com या E- mail वर पाठविण्यात यावी. कोल्हापूर जिल्हयात निवडणूक आचारसंहिता असल्याने मुलाखतीचा निकाल हा दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी आचारसंहिता संपल्यावर जाहीर करण्यात यावा व त्याची प्रत उपरोक्तप्रमाणे या कार्यालयास पाठवावी.

५. तसेच प्रत्येक दिवशी किती उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करण्यात आली याची माहिती त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत व त्यापैकी किती उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले त्याचीही माहिती दुपारी १.०० वाजेपर्यंत उपरोक्त E- mail वर देण्यात यावी.

६. परिचारीका या पदासाठी निवड करताना फक्त महिला उमेदवारांचाच विचार करण्यात यावा.

उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

आयुक्त (कु.क) व संचालक,
राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,
महाराष्ट्र, मुंबई करिता

प्रत –

- उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, ठाणे/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अकोला/नागपूर
- जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, सर्व जिल्हे (ठाणे जिल्हा वगळून)
- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व जिल्हे (ठाणे जिल्हा वगळून)

| Sr. No | Name of Candidates | Marks Obtained for Educational Qualification (out of 80 marks) | | | | | Marks Obtained for the experience in Govt./Semi Govt./ Local Self Govt./NRHM | | Marks given in the interview for Subject Knowledge (out of 10 marks) | Total Marks (Total of column no. 7+9+10) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks based on % of Garduation marks proportionately out of 80 marks | Extra Marks for Additional Qualification | | | Total Out of 80 Marks (Total of column no. 3+4+5+6 maximum upto 80 marks) | Experience (in no. of years) | Marks given for experience (maximum upto 10 marks) | | |
| | | | MBBS (10 marks) | P.G Diploma (3 marks) | P.G Degree (5 marks) | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |

| Sr. No | Name of Candidates | Marks Obtained for Educational Qualification (out of 80 marks) | | | | Marks Obtained for the experience in Govt./Semi Govt./ Local Self Govt./NRHM | | Marks given in the interview for Subject Knowledge (out of 10 marks) | Total Marks (Total of column no. 6+8+9) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks based on % of Diploma/Degree marks proportionately out of 80 marks | Extra Marks for Additional Qualification | | Total Out of 80 Marks (Total of column no. 3+4+5 maximum upto 80 marks) | Experience (in no. of years) | Marks given for experience (maximum upto 10 marks) | | |
| | | | Degree (5 marks) | P.G Degree (3 marks) | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |

| Sr. No | Name of Candidates | Marks Obtained for Educational Qualification (out of 80 marks) | | | | Marks Obtained for the experience in Govt./Semi Govt./ Local Self Govt./NRHM | | Marks given in the interview for Subject Knowledge (out of 10 marks) | Total Marks (Total of column no. 6+8+9) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Marks based on % of ANM/GNM Course marks proportionately out of 80 marks | Additional Marks | | Total Out of 80 Marks (Total of column no. 3+4+5 maximum upto 80 marks) | Experience (in no. of years) | Marks given for experience (maximum upto 10 marks) | | |
| | | | For GNM Course (5 marks) | If Loan is taken for ANM/GNM Course under NRHM (5 marks) | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |

# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, महाराष्ट्र

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम – कंत्राटी स्वरुपातील भरतीबाबत जाहीर सूचना

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत दिनांक २५ ते २८ फेब्रुवारी, २०१३ या कालावधीत वैद्यकिय अधिकारी MBBS/BAMS (स्त्री व पुरुष), औषधनिर्माता व परिचारीका यांच्या निवडीसाठी दिनांक १७ फेब्रुवारी, २०१३ रोजी वर्तमानपत्रात थेट मुलाखती (Walk-in-Interview) जाहीरात देण्यात आलेली आहे.

संपूर्ण निवडप्रक्रिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येत आहे. याबाबतची माहिती इच्छूक उमेदवारांना होण्याच्या दृष्टीने खालील अधिकची माहिती जाहीररीत्या देण्यात येत आहे.

१. मुलाखतीसाठी अर्जाची नोंदणी करण्याकरिता इच्छूक उमेदवारांनी सकाळी ९.०० वाजता उपस्थित राहणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या अर्जाची नोंदणी केल्यानंतर त्याची त्वरीत छाननी करण्यात येईल. छाननीअंती एका पदासाठी पाच उमेदवार याप्रमाणे पदांनुसार पदवी/पदविका/ ANM कोर्स परिक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल व त्यानुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

२. निवडप्रक्रिया ही एकूण १०० गुणांची राहील.

३. यामधील ८० पैकी गुण हे पदांनुसार पदवी/पदविका/ANM/GNM कोर्स च्या शेवटच्या वर्षाच्या गुणांवर आधारित Proportionately देण्यात येतील. त्यासोबत –

- वैदयकिय अधिकारी MBBS असल्यास त्यास अतिरिक्त १० गुण देण्यात येतील.
- वैद्यकिय अधिकारी पदव्युत्तर पदविका धारक असल्यास अतिरिक्त ३ गुण, पदव्युत्तर पदवी धारक असल्यास अतिरिक्त ५ गुण देण्यात येतील.
- परिचारीका पदासाठी उमेदवार GNM अर्हताधारक असल्यास त्यांना अतिरिक्त ५ गुण देण्यात येतील. त्याचप्रमाणे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कर्ज घेऊन ANM कोर्स पूर्ण केले असल्यास अशा उमेदवारांना ५ गुण अतिरिक्त देण्यात येतील.
- परिचारीका या पदासाठी फक्त महिला उमेदवारांचाच विचार करण्यात येईल.
- औषध निर्माता यांचेबाबत पदवी असल्यास अतिरिक्त ५ गुण व पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त ३ गुण देण्यात येतील.
- उपरोक्त सर्व गुणांची एकत्रित बेरीज ८० पेक्षा अधिक असणार नाहीत.

४. १० गुण अनुभवावर आधारीत असतील. यामध्ये दोन वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, २ वर्ष अनुभव असल्यास ५ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त १० गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत असणारा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

५. १० गुण हे मुलाखती दरम्यान विषय ज्ञानासाठी देण्यात येतील.

याप्रमाणे सदरच्या मुलाखतीसाठी गुणांकन पद्धती असेल याची इच्छूक उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. मुलाखतीनंतर त्याच दिवशी मुलाखतीचा निकाल तपशीलवार गुणासहीत जाहिर करण्यात येईल. कोल्हापूर जिल्हयामध्ये निवडणूक आचारसंहिता असल्याने मुलाखतीचा निकाल दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी जाहिर करण्यात येईल.

७. उपरोक्त निवड प्रक्रियेसंबंधात उमेदवारांना काहीही अडचण आल्यास त्यांनी संबंधीत जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष निवड समिती किंवा आयुक्त (कु.क) व संचालक, मुंबई कार्यालयाशी (दूरध्वनी ०२२ २२७१७५००) कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

आयुक्त (कुटुंब कल्याण) व संचालक,
राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,
महाराष्ट्र, मुंबई.

# आयुक्त, कुटुंब कल्याण व
# संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NRHM

दुरध्वनी - ०२२ - २२६४००६३/६५
०२२ - २२७१ ७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

'आरोग्य भवन', ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.


क्र.राग्राआअ/राबास्वाका/ /१३
दिनांक - २२ फेब्रुवारी, २०१३

प्रति,
जिल्हाधिकारी, (सर्व)
(ठाणे वगळता)

**विषय - राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत दिनांक २५ ते २८ फेब्रुवारी २०१३ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या कंत्राटी स्वरुपाच्या भरतीप्रक्रियेबाबत...**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा राष्ट्रीय पातळीवरील शुभारंभ दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी ठाणे जिल्हयातील पालघर येथे पार पडला. या कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील सर्व बालकांची आरोग्य तपासणी वैद्यकीय पथकामार्फत करण्यात येणार आहे. यासाठी तालुकानिहाय वैद्यकीय पथके नियुक्त करण्यात येत आहेत. एका वैद्यकीय पथकामध्ये १ वैद्यकीय अधिकारी (पुरुष) (MBBS/BAMS), १ वैद्यकीय अधिकारी (महिला) (MBBS/BAMS), १ परिचारीका (ANM) व १ औषधनिर्माता (डी फार्म) यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करण्यात येणार आहे. या पथकांची नियुक्ती ही त्वरीत करण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये एकाच वेळी दिनांक २५ ते २८ फेब्रुवारी २०१३ या कालावधीत थेट मुलाखतींव्दारे (Walk in Interview) भरतीप्रक्रिया राबविण्यात येत आहे. निवड प्रक्रियेबाबतचा कार्यक्रम खालीलप्रमाणे असणार आहे :

| अ.क्र. | पदाचे नाव | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (महिला) | २५.०२.२०१३ |
| २ | वैद्यकीय अधिकारी (पुरुष) | २६.०२.२०१३ |
| ३ | परिचारीका (ANM) | २७.०२.२०१३ |
| ४ | औषधनिर्माता | २८.०२.२०१३ |

उपरोक्त पदांची निवड खालील अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या समितीव्दारे घेण्यात येईल.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - अध्यक्ष

२. जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी - सदस्य

३. जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य

४. जिल्हा शल्य चिकीत्सक - सदस्य सचिव

उपरोक्त निवडप्रक्रिया ही गुणवत्तेच्या आधारे पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्या सुचना समितीमधील सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. आपणास विनंती करण्यात येते की आपण आपल्या कार्यालयातील एका कार्यक्षम अधिकाऱ्यास जिल्हाधिकारी यांचे प्रतिनीधी म्हणून सदस्य या नात्याने समितीच्या कामकाजासाठी नियुक्त करण्यात यावे व दिनांक २५ ते २८ फेब्रुवारी २०१३ या कालावधीत निवड प्रक्रियेसाठी पाठवावे.

मुलाखतीमध्ये गुणांकन कशा पध्दतीने करावे याबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याची प्रत सोबत जोडणेत येत आहे.

आपणास विदीतच आहे की, जिल्हाधिकारी हे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जिल्हास्तरावरील जिल्हा आरोग्य व कुटुंब कल्याण समितीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे आपणास विनंती करण्यात येते की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणारी भरती प्रक्रिया गुणवत्तापूर्ण व पारदर्शी पध्दतीने होणेसाठी निवड समितीस आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करावे. निवड प्रक्रियेदरम्यान कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबतची दखल त्वरीत घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

आयुक्त (कुटुंब कल्याण) व संचालक
राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
महाराष्ट्र, मुंबई

# आयुक्त, कुटुंब कल्याण व
# संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२२ - २२६४००६३/६५<br>०२२ - २२७१ ७५००<br>फॅक्स - ०२२ - २२६४२९५५<br>E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | 'आरोग्य भवन', ३रा मजला,<br>सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,<br>पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,<br>फोर्ट, मुंबई ४०० ००१. ७६४७५-५७७ |


राग्राआअ/शाआत/राबान्वाका पदभरती/ /१२.१३
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१३

प्रति,

उपसंचालक,
आरोग्य सेवा मंडळ,
ठाणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, अकोला, लातूर, औरंगाबाद, पुणे

**विषय : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत थेट मुलाखत पध्दतीने पद भरतीचेवेळी निरीक्षण करण्यासाठी अधिकारी नेमणेबाबत.**

संदर्भ : दि १७ फेब्रुवारी २०१३ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात.

उपरोक्त संदर्भाधीन जाहिरातीनुसार राज्यातील ३२ जिल्हयांमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत वैद्यकिय अधिकारी, औषधनिर्माता व परिचारीका या पदांच्या थेट मुलाखती दिनांक २५.२.२०१३ ते २८.२.२०१३ या कालावधीत घेण्यात येणार आहेत. सदर मुलाखतीसाठी आपल्या कार्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याची निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात यावी व तसे या कार्यालयास कळवावे.

आयुक्त (कु.क) व संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान
मुंबई, महाराष्ट्र. करिता

प्रत योग्य कार्यवाहीसाठी

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
  औरंगाबाद, अकोला, अमरावती, अहमदनगर, बीड, भंडारा, बुलडाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, जळगाव, कोल्हापूर, लातूर, नागपुर, नांदेड, नंदुरबार,नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, वर्धा ,वाशिम आणि यवतमाळ.

# आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NRHM

दुरध्वनी - ०२२ - २२६४००६३/६५
०२२ - २२७१ ७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२६५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

'आरोग्य भवन', ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

६८७९६ - ३४९

राग्राआअ/शाआत/राबास्वाका पदभरती/ /१२.१३
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१३

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,
(औरंगाबाद, अकोला, अमरावती, अहमदनगर,बीड, भंडारा, बूलढाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, जळगाव, कोल्हापूर, लातूर, नागपुर, नांदेड, नंदुरबार,नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, वर्धा ,वाशिम आणि यवतमाळ)

**विषय : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत थेट मुलाखत पध्दतीने पद भरतीसंबंधी मार्गदर्शक सुचना.**

संदर्भ : दि १७ फेब्रुवारी २०१३ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात.

दिनांक १७ फेब्रुवारी, २०१३ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या थेट मुलाखतीद्वारे (Walk-In-Interview) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत पद भरती संबंधीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

आयुक्त (कु.क) व संचालक
राष्ट्रीय आरोग्य अभियान
मुंबई, महाराष्ट्र.

प्रत योग्य कार्यवाहीसाठी

- उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, अकोला, लातूर, औरंगाबाद, पुणे
- जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (वरील सर्व जिल्हे)
- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (वरील सर्व जिल्हे)

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य सुरक्षा कार्यक्रमांतर्गत

## भरतीबाबतच्या मार्गदर्शक सुचना

१. अर्ज स्वीकारणे व नोंदणी ही मुलाखतीच्या ठिकाणी सकाळी ९ वाजता सुरु करण्यात येईल. अर्ज स्वीकारणे व नोंदणीचा कालावधी हा सकाळी ९ ते १० असा ठेवण्यात यावा, परंतु अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम वेळेबाबत स्थानिक परिस्थितीप्रमाणे आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार निवड समितीला असेल व त्याबाबत गरजेनुरूप निर्णय घेण्यात यावा व ती सूचना फलकावर लावण्यात यावी.

२. सकाळी १० वाजता (अथवा निवड समितीने ठरविलेली अर्ज स्वीकारण्याची अंतीम वेळ) रांगेत उभ्या असणाऱ्या शेवटच्या उमेदवाराला एक क्रमांक देऊन उर्वरित रांगेतील उमेदवारांना त्या पुढील नंबर देण्यात यावे.

३. अशाप्रकारे १० वाजता रांगेमध्ये हजर असणाऱ्या सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी संधी मिळेल याची खात्री करावी.

४. अर्जाची नोंदणी केल्यानंतर त्वरीत अर्जाची छाननी करण्यात यावी. स्वीकारलेल्या अर्जाची छाननी पूर्ण होईपर्यंत हे काम सुरु राहील.

५. अर्जाची छाननी करण्यासाठी प्रत्येकी २ व्यक्तीचे ६ कांऊटर्स बनवावे. आवश्यकता भासल्यास जास्त कांऊटर्स करण्यास हरकत नाही.

६. अर्जाच्या छाननीच्या कामावर निरिक्षण व संनियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी.

७. अर्जाची छाननी करताना मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे व अनुभव प्रमाणपत्रांची छाननी करावी. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राह्य धरावा.

८. प्रत्येक उमेदवाराचा संपुर्ण माहितीचा एक फॉर्म भरावा. (नमूना सोबत जोडण्यात आला आहे.)

९. वैदयकिय अधिकारी यांचे बाबतीत BAMS असल्यास MCIM यांचे Registration Certificate बंधनकारक राहील आणि MBBS असल्यास MMC यांचे Registration Certificate बंधनकारक राहील.

१०. ANM/GNM यांचे बाबतीत MNC Certificate असणे बंधनकारक राहील.

११. औषध निर्माता यांचे बाबतीत Maharashtra State Pharmacy Council चे Registration certificate असणे अनिवार्य आहे.

१२. अर्जाच्या छाननीअंती अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांचे अपात्रतेचे कारण फॉर्मवर व त्याच्या अर्जावर नमूद करावे व त्यांना जाण्यास सांगावे.

१३. जे उमेदवार पात्र ठरतील त्यांना मुलाखत क्रमांक देऊन मुलाखत हॉलमध्ये बसण्यासाठी पाठविण्यात यावे.

## मुलाखतीच्या सुचना

१. छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात यावा.

२. मुलाखतीसाठी आवश्यकतेनूसार योग्य तो पोलिस बंदोबस्त ठेवण्याची दक्षता घ्यावी.

३. मुलाखतीसाठी एकास पाच (कमाल मर्यादा) याप्रमाणे उमेदवारांना बोलावण्यात यावे.

४. जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार याप्रमाणे पदानुसार पदवी/पदविका/ANM course परिक्षेतील गुणवत्तेनूसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावावा.

५. मुलाखतीसाठी २० उमेदवारांचा एक गट याप्रमाणे गट तयार करुन त्यांना मुलाखतीसाठी दिड ते दोन तासाची वेळ देण्यात यावी. **ही वेळ अनुक्रमांसह मुलाखत केंद्राच्या बाहेर ठळक अक्षरात लावावी.**

६. एकूण १०० गुणांची मुलाखत असावी.

७. यामधील ८० पैकी गुण हे पदानूसार पदवी/पदविका/ANM course च्या शेवटच्या वर्षाच्या गुणांवर आधारीत (Proportionately) देण्यात यावे.

- वैदयकिय अधिकारी MBBS असल्यास त्यास अतिरिक्त १० गुण देण्यात यावे मात्र एकूण गुण ८० पेक्षा अधिक होणार नाही याकडे लक्ष दयावे.
- पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त ३ गुण, पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त ५ गुण देण्यात यावे. एकूण गूण ८० पेक्षा अधिक होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- ANM पदासाठी उमेदवार GNM अर्हताधारक असल्यास त्यांना अतिरिक्त ५ गुण देण्यात यावे. त्याचप्रमाणे राग्राआअ अंतर्गत कर्ज घेऊन ANM कोर्स पूर्ण केले असल्यास अशा उमेदवारांना ५ गुण अतिरिक्त देण्यात यावे. एकूण गूण ८० पेक्षा अधिक होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- औषध निर्माता यांचेबाबत पदवी असल्यास अतिरिक्त ५ गुण व पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरिक्त ३ गुण देण्यात यावे. एकूण गूण ८० पेक्षा अधिक होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

८. १० गुण अनुभवास आधारीत असावे (दोन वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, २ वर्ष अनुभव असल्यास ५ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त १० गुण राहतील) अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनूभव ग्राहय धरावा.

९. १० गुण विषय ज्ञानासाठी देण्यात यावे. प्रत्येक उमेदवाराची मुलाखत झाल्यानंतर निवड समितीच्या सदस्यांनी विचारविनिमय करुन उमेदवाराच्या गुणवत्तेनूसार १० पैकी गुण एकमताने गुणपत्रिकेवर नमुद करावे (निवड समितीतील कोणत्याही सदस्याने त्या उमेदवारास स्वतंत्रपणे वेगवेगळे गुण देऊ नयेत)

१०. मुलाखत समितीमध्ये असलेल्या प्रत्येक सभासदाची वेगवेगळी गुणपत्रिका न बनविता एकत्रित एकच गुणपत्रिका बनवून त्यावर सर्व सभासदांची स्वाक्षरी व त्यांचे पदनाम व तारीख नमूद करावी व ही एकत्रित गुणपत्रिका तयार झाल्याशिवाय मुलाखत सदस्यांनी मुलाखत सभागृह सोडू नये.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

## अर्जदाराच्या माहितीचा फॉर्म

अर्जदाराचे संपूर्ण नाव - ..............................

अर्ज केलेल्या पदाचे नाव - ..............................

अर्जदाराचा संपूर्ण पत्ता - ..............................
व भ्रमणध्वनी क्रमांक (संपर्कासाठी) ..............................
..............................

अर्जदाराचा ई-मेल आय.डी. ..............................

शैक्षणिक अर्हता -

| अ.क्र | पदवी/पदविका पदव्युत्तर पदवी/पदविका/ ANM course | अंतीम वर्षात मिळालेल्या गुणांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

अनुभव

| अ.क्र | शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान | अनुभवाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी

---

(कार्यालयीन कामासाठी)

अपात्र असल्यास अपात्रतेचे कारण - ..............................
..............................

अधिकाऱ्याची स्वाक्षरी,
नाव व पदनाम

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य


| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दुरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दुरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजाबहादुर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८२१८ / २६०५८१०९<br>Email ID : spm.pune@gmail.com |
| **आरोग्य सेवा**<br>तातडीचे | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य-१५(क)/ /२०१३ 92333-६५<br>दिनांक : १६/०२/२०१३ |


9L

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद ............. (सर्व)

**विषय :- राष्ट्रीय बाल स्वास्थ सुरक्षा कार्यक्रम तपासणी पथकाच्या पदांच्या भरतीबाबतच्या सूचना.......**

**संदर्भ :- मा.आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, एनआरएचएम, मुंबई यांची मान्य टिप्पणी..**

राज्य आरोग्य सोसायटी मार्फत प्रत्येक जिल्हयामध्ये सुरु करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय बाल स्वास्थ सुरक्षा कार्यक्रमाबाबतच्या भरावयाच्या तपासणी पथकांच्या निवड प्रक्रियेबाबत जाहिरात दैनिक लोकमतच्या राज्यातील सर्व वर्तमानपत्रामध्ये तसेच प्रत्येक जिल्हयांच्या प्रमुख स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिनांक १७.२.२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. आपण त्याचे अवलोकन करावे व आपल्या स्तरावर पुढील कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करण्यात यावी. सोबत निव्वळ प्रक्रियेबाबतच्या सर्व साधारण सूचना आपल्या अवलोकनार्थ देण्यात येत आहेत, त्याचेही अवलोकन व्हावे. जिल्हानिहाय भरावयाची पदे व त्यांची संख्या सोबतच्या तक्त्यामध्ये देण्यात येत आहे. त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी.

सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे जिल्हा निहाय पदे भरण्याबाबत खालील सूचना देण्यात येत आहेत.

- जिल्हा शल्यचिकित्सक यांनी स्थानिक महत्वाच्या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊन त्याप्रमाणे सदर पत्रातील पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.
- सदर पदे थेट मुलाखतीव्दारे (Walk-in Interview) उमेदवार निवडण्याची प्रक्रिया सर्व जिल्हयांमध्ये दिलेल्या मुलाखतीच्या कार्यक्रमानुसारच पूर्ण करावयाची आहे.
- निवड समिती सदस्य खालील प्रमाणे राहील.

    ५) मुख्य कार्यकारी अधिकारी - अध्यक्ष

    ६) मा.जिल्हा अधिकारी यांचे प्रतिनिधी

    ७) जिल्हा शल्य चिकित्सक - सदस्य सचिव

    ८) जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य

१५. जाहिरात वृत्तपत्रात प्रकाशित करण्याची तारिख - १६/२/२०१३.

१६. निवड प्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालयात घेण्यात यावी.

१७. निवड प्रक्रियेचे व्यवस्थापनाची जबाबदारी DPM व DRCHO यांची राहिल.

१८. मुलाखतीचे वेळापत्रक

५) महिला वैद्यकिय अधिकारी दिनांक २५/०२/२०१३

६) पुरुष वैद्यकिय अधिकारी दिनांक २६/०२/२०१३

७) परिचारिका (ANM) दिनांक २७/०२/२०१३

८) औषध निर्माता दिनांक २८/०२/२०१३

१९. अर्ज व नोंदणी मुलाखतीच्या दिवशी सकाळी ९.०० वाजता

२०. अर्जाची छाननी मुलाखती दिवशी सकाळी १०.०० ते ११.००

२१. मुलाखतीची वेळ - सकाळी ११.०० पासून ठेवण्यात यावी.

२२. अर्जाची नोंदणी करण्याकरिता ४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

२३. छाननी करण्याकरिता एकूण ६ पथके (वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचारी) यांची नियुक्ती करावी.

२४. मुलाखतीकरिता गठित करण्यात आलेल्या समितीच्या सदस्यांमार्फत निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल व अंतिम निर्णय त्याच दिवशी जाहिर करण्यात यावी.

२५. राज्यामध्ये सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक यांनी उपरोक्त तारखांनाच एकाच वेळी ही कार्यवाही पुर्ण करावी.

२६. पदांची संख्या निश्चित करतांना प्रथम प्राधान्य जिल्हास्तरावर उपलब्ध असणाऱ्या प्रतिक्षायादीतील उमेदवारांना देण्यात यावी.

२७. प्रत्येक पदासाठी प्रतिक्षायादी ठेवण्यात यावी.

२८. उमेदवारांना मुलाखतीच्यावेळी त्यांच्यासोबत अर्ज व आवश्यक प्रमाणपत्रांची मूळ पत्रके व सांक्षाकित केलेली छायांकित पत्रके सोबत आणण्याबाबत जाहिरातीमध्ये नमूद करावे.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,

कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे

## जिल्हानिहाय पदांची संख्या

| अ. क्र | जिल्हा | एकूणमहिलावैदयकिय अधिकारी | एकूणपुरुषवैदयकिय अधिकारी | एकूणऔषध निर्माता (फार्मासिस्ट) | एकूणपरिचारीका | एकूणपदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ३१ | ३१ | ३१ | ४२ | १३५ |
| २ | अकोला | १० | १० | १० | १९ | ४९ |
| ३ | अमरावती | १६ | १६ | १६ | [illegible] | ८० |
| ४ | अहमदनगर | ४५ | ४५ | ४५ | ६१ | ११६ |
| ५ | बीड | २६ | २६ | २६ | ३९ | ११७ |
| ६ | भंडारा | ८ | ८ | ८ | १६ | ४० |
| ७ | बुलढाणा | १९ | १९ | १९ | ३३ | ९० |
| ८ | चंद्रपुर | ९ | ९ | ९ | २४ | ५१ |
| ९ | धुळे | २३ | २३ | २३ | २९ | ९८ |
| १० | गडचिरोली | ४ | ४ | ४ | १६ | २८ |
| ११ | गोंदिया | १० | १० | १० | १८ | ४८ |
| १२ | हिंगोली | ११ | ११ | ११ | १७ | ५० |
| १३ | जालना | ३४ | ३४ | ३४ | ४३ | १४५ |
| १४ | जळगाव | २१ | २१ | २१ | ३८ | १०१ |
| १५ | कोल्हापुर | २८ | २८ | २८ | ४२ | १२६ |
| १६ | लातुर | २० | २० | २० | ३० | ९० |
| १७ | नागपुर | २१ | २१ | २१ | ३६ | ९९ |
| १८ | नांदेड | २५ | २५ | २५ | ४३ | ११८ |
| १९ | नंदुरबार | १५ | १५ | १५ | २२ | ६७ |
| २० | नाशिक | ५१ | ५१ | ५१ | ७३ | २३६ |
| २१ | उस्मानाबाद | ११ | ११ | ११ | २० | ५३ |
| २२ | परभणी | ११ | ११ | ११ | २१ | ५४ |
| २३ | पुणे | ४८ | ४८ | ४८ | ६६ | २१० |
| २४ | रायगड | १२ | १२ | १२ | २८ | ६४ |
| २५ | रत्नागिरी | ११ | ११ | ११ | २० | ५३ |
| २६ | सांगली | २० | २० | २० | ३२ | ९२ |
| २७ | सातारा | २४ | २४ | २४ | ३६ | १०८ |
| २८ | सिंधुदुर्ग | २ | २ | २ | १० | १६ |
| २९ | सोलापुर | ३७ | ३७ | ३७ | ५२ | १६३ |
| ३० | वर्धा | ५ | ५ | ५ | १२ | २७ |
| ३१ | वाशिम | ९ | ९ | ९ | १७ | ४४ |
| ३२ | यवतमाळ | १८ | १८ | १८ | ३५ | ८९ |
| | एकुण | ६३५ | ६३५ | ६३५ | १०२२ | २९२७ |

| | | |
|---|---|---|
| | **राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे**<br>**महाराष्ट्र राज्य** | |
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८२१८ / २६०५८१०९<br>Email ID : spm.pune@gmail.com |
| **आरोग्य सेवा**<br>**तातडीचे** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य-१५(क)/ /२०१३ 11689-89<br>दिनांक : १६/०२/२०१३ |

प्रति,
जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय,.....(सर्व)

**विषय :- राष्ट्रीय बाल स्वास्थ सुरक्षा कार्यक्रम तपासणी पथकाच्या पदांच्या भरतीबाबतच्या सूचना......**

राज्य आरोग्य सोसायटी मार्फत प्रत्येक जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय बाल स्वास्थ सुरक्षा कार्यक्रमाबाबतच्या भरावयाच्या तपासणी पथकांच्या निवड प्रक्रियेबाबत जाहिरात दैनिक लोकमतच्या राज्यातील सर्व वर्तमानपत्रामध्ये तसेच प्रत्येक जिल्ह्यांच्या प्रमुख स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिनांक १७.२.२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. आपण त्याचे अवलोकन करावे व आपल्या स्तरावर पुढील कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करण्यात यावी. सोबत निवड प्रक्रियेबाबतच्या सर्व साधारणा सूचना आपल्या अवलोकनार्थ देण्यात येत आहेत, त्याचेही अवलोकन व्हावे. जिल्हानिहाय भरावयाची पदे व त्याची संख्या सोबतच्या तक्त्यामध्ये देण्यात येत आहे. त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी.

सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे जिल्हा निहाय पदे भरण्याबाबत खालील सूचना देण्यात येत आहेत.

- सदर पदे थेट मुलाखतीव्दारे (Walk-in Interview) उमेदवार निवडण्याची प्रक्रिया सर्व जिल्ह्यांमध्ये दिलेल्या मुलाखतीच्या कार्यक्रमानुसारच पूर्ण करावयाची आहे.
- निवड समिती सदस्य खालील प्रमाणे राहील.

  १) मुख्य कार्यकारी अधिकारी - अध्यक्ष

  २) मा.जिल्हा अधिकारी यांचे प्रतिनिधी

  ३) जिल्हा शल्य चिकित्सक - सदस्य सचिव

  ४) जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य

१. निवड प्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालयात घेण्यात यावी.

२. निवड प्रक्रियेचे व्यवस्थापनाची जबाबदारी DPM व DRCHO यांची राहिल.

३. मुलाखतीचे वेळापत्रक

१) महिला वैद्यकिय अधिकारी दिनांक २५/०२/२०१३

२) पुरुष वैद्यकिय अधिकारी दिनांक २६/०२/२०१३

३) परिचारिका (ANM) दिनांक २७/०२/२०१३

४) औषध निर्माता दिनांक २८/०२/२०१३

४. अर्ज व नोंदणी मुलाखतीच्या दिवशी सकाळी ९.०० वाजता

५. अर्जाची छाननी मुलाखती दिवशी सकाळी १०.०० ते ११.००

६. मुलाखतीची वेळ - सकाळी ११.०० पासून ठेवण्यात यावी.

७. अर्जाची नोंदणी करण्याकरिता ४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

८. छाननी करण्याकरिता एकूण ६ पथके (वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचारी) यांची नियुक्ती करावी.

९. मुलाखतीकरिता गठित करण्यात आलेल्या समितीच्या सदस्यांमार्फत निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल व अंतिम निर्णय त्याच दिवशी जाहिर करण्यात यावा.

१०. राज्यातील सर्व जिल्हयामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक यांनी उपरोक्त तारखांना एकाच वेळी ही कार्यवाही पुर्ण करावी.

११. पदांची संख्या निश्चित करतांना प्रथम प्राधान्य जिल्हास्तरावर उपलब्ध असणाऱ्या प्रतिक्षायादीतील उमेदवारांना देण्यात यावी.

१२. प्रत्येक पदासाठी प्रतिक्षायादी ठेवण्यात यावी.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,
कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे ६

प्रत :
उपसंचालक, आरोग्य सेवा,
............ मंडळे ......... (सर्व)

प्रत माहीतीस्तव सविनय सादर :

- मा. आयुक्त, (कु.क.) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई
- मा. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय मुंबई

| जिल्हानिहाय पदांची संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | जिल्हा | एकूणमहिलावैदयकिय अधिकारी | एकूणपुरुषवैदयकिय अधिकारी | एकूणऔषध निर्माता (फार्मासिस्ट) | एकूणपरिचारीका | एकूणपदांची संख्या |
| १ | औरंगाबाद | ३१ | ३१ | ३१ | ४२ | १३५ |
| २ | अकोला | १० | १० | १० | १९ | ४९ |
| ३ | अमरावती | १६ | १६ | १६ | ३२ | ८० |
| ४ | अहमदनगर | ४५ | ४५ | ४५ | ६१ | १९६ |
| ५ | बीड | २६ | २६ | २६ | ३९ | ११७ |
| ६ | भंडारा | ८ | ८ | ८ | १६ | ४० |
| ७ | बुलढाणा | १९ | १९ | १९ | ३३ | ९० |
| ८ | चंद्रपुर | ९ | ९ | ९ | २४ | ५१ |
| ९ | धुळे | २३ | २३ | २३ | २९ | ९८ |
| १० | गडचिरोली | ४ | ४ | ४ | १६ | २८ |
| ११ | गोंदिया | १० | १० | १० | १८ | ४८ |
| १२ | हिंगोली | ११ | ११ | ११ | १७ | ५० |
| १३ | जालना | ३४ | ३४ | ३४ | ४३ | १४५ |
| १४ | जळगाव | २१ | २१ | २१ | ३८ | १०१ |
| १५ | कोल्हापुर | २८ | २८ | २८ | ४२ | १२६ |
| १६ | लातुर | २० | २० | २० | ३० | ९० |
| १७ | नागपुर | २१ | २१ | २१ | ३६ | ९९ |
| १८ | नांदेड | २५ | २५ | २५ | ४३ | ११८ |
| १९ | नंदुरबार | १५ | १५ | १५ | २२ | ६७ |
| २० | नाशिक | ५१ | ५१ | ५१ | ७३ | २२६ |
| २१ | उस्मानाबाद | ११ | ११ | ११ | २० | ५३ |
| २२ | परभणी | ११ | ११ | ११ | २१ | ५४ |
| २३ | पुणे | ४८ | ४८ | ४८ | ६६ | २१० |
| २४ | रायगड | १२ | १२ | १२ | २८ | ६४ |
| २५ | रत्नागिरी | ११ | ११ | ११ | २० | ५३ |
| २६ | सांगली | २० | २० | २० | ३२ | ९२ |
| २७ | सातारा | २४ | २४ | २४ | ३६ | १०८ |
| २८ | सिंधुदुर्ग | २ | २ | २ | १० | १६ |
| २९ | सोलापुर | ३७ | ३७ | ३७ | ५२ | १६३ |
| ३० | वर्धा | ५ | ५ | ५ | १२ | २७ |
| ३१ | वाशिम | ९ | ९ | ९ | १७ | ४४ |
| ३२ | यवतमाळ | १८ | १८ | १८ | ३५ | ८९ |
| | एकुण | ६३५ | ६३५ | ६३५ | १०२२ | २९२७ |

# आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी - ०२२ - २२६४००६३/६५
०२२ - २२७१ ७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

'आरोग्य भवन', ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.


जा.क्र.राग्राआअ/राबास्वाका-नियुक्ती/ /२०१२.१३
दिनांक २० फेब्रुवारी, २०१३

प्रति,

मा. मुख्य निवडणूक आयुक्त,
नविन प्रशासकीय इमारत,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय: **कोल्हापूर जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत तपासणी पथकामध्ये वैद्यकीय अधिकारी, औषधनिर्माता व सहाय्यक परिचारीका प्रसविका यांच्या नियुक्तीबाबत...**

संदर्भ : जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, कोल्हापूर यांचे पत्र क्र जिशचिको/सिपीआर/शाआतका/१३४४-४६/१२, दि. १८.२.२०१२.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम दिनांक १ एप्रिल २०१३ पासून सर्व राज्यात सुरु करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.यासाठी केंद्रशासनाचे निर्देशानूसार स्वतंत्र तपासणी पथके स्थापन करण्यात येणार आहेत. या पथकांमध्ये दोन वैद्यकीय अधिकारी (एक पुरुष व एक महिला वैद्यकीय अधिकारी), एक औषधनिर्माता व एक सहाय्यक परिचारीका प्रसविका यांचा समावेश आहे. सदरच्या भरतीसाठी राज्यस्तरावरुन दि १७ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे व राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये एकाच वेळी ( दिनांक २५ ते २८ फेब्रुवारी, २०१३ या कालावधीमध्ये) थेट मुलाखतीद्वारे भरतीसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर जाहिरातीची एक प्रत या पत्रासोबत जोडली आहे.

कोल्हापूर जिल्हयामध्ये चंदगड तालुक्यात विधानसभेच्या निवडणूकीमुळे पूर्ण जिल्हयात आचारसंहीता लागू करण्यात आलेली असल्याचे तसेच सदर निवडणूकीची तारीख ही २४ फेब्रुवारी २०१३ असून आचारसंहीता ही ३ मार्च २०१३ पर्यंत असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर यांनी कळविले आहे.

या संदर्भात सादर करण्यात येते की, कोल्हापूर जिल्हयामध्ये सदर भरती प्रक्रियेसाठी मुलाखती हया मतदान प्रक्रिया संपल्यावर म्हणजे दि. २५ ते २८ फेब्रुवारी, २०१३ या कालावधीमध्ये घेण्यात येणार असून सदर मुलाखतींचा निकाल हा आदर्श आचारसंहीता संपल्यानंतर दिनांक ४ मार्च २०१३ रोजी जाहीर करण्यात येईल. तरी सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आयुक्त (कुटुंब कल्याण) व संचालक,
राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,
मुंबई महाराष्ट्र.

प्रत माहितीस्तव

- मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
- अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कु.क), माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.
- जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, कोल्हापूर

**महाराष्ट्र शासन**
**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान**
**राज्य आरोग्य सोसायटी मुंबई.**

# थेट मुलाखती (Walk – In- Interview)

राज्य आरोग्य सोसायटी, कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत खालील पदे कंत्राटी पध्दतीने जिल्हास्तरावर भरणेसाठी थेट मुलाखती घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पदाचे ठिकाण | शैक्षणिक अर्हता | वय | अनुभव | एकुण पदांची संख्या | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी (राष्ट्रीय बाल स्वास्थ पथक) | औरंगाबाद, अकोला, अमरावती, अहमदनगर, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपुर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, जळगाव, कोल्हापुर, लातुर, नागपुर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापुर, वर्धा, वाशिम, यवतमाळ (एकूण ३२ जिल्हे) | MBBS किंवा BAMS | ३८ वर्षापर्यंत शिथिल | किमान २ वर्षाचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | ६३५ पुरुष व ६३५ महिला | आदिवासी तालुक्यासाठी रु.१८,०००/- प्रमाणे प्रतिमाह मानधन<br>बिगर आदिवासी तालुक्यासाठी रु.१५,०००/- प्रमाणे प्रतिमाह मानधन (एकत्रित मानधन) |
| २ | औषध निर्माता | | D. pharm | ३८ वर्षापर्यंत शिथिल | किमान २ वर्षाचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | ६३५ | रु. ८,०००/- प्रमाणे प्रतिमाह मानधन (एकत्रित मानधन) |
| ३ | परिचारीका (ANM) | | परिचारीका या पदासाठी १८ महिन्यांचा प्रशिक्षण कोर्स पूर्ण असणे आवश्यक आहे (उमेदवाराची महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडे नोंदणी असणे आवश्यक आहे) | ३८ वर्षापर्यंत शिथिल | किमान २ वर्षाचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | १०२२ | आदिवासी तालुक्यासाठी रु.९,५००/- प्रमाणे प्रतिमाह मानधन<br>बिगर आदिवासी तालुक्यासाठी रु.८,०००/- प्रमाणे प्रतिमाह मानधन (एकत्रित मानधन) |

## जिल्हानिहाय रिक्त पदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | जिल्हा | एकूण महिला वैदयकिय अधिकारी | एकूण पुरुष वैदयकिय अधिकारी | एकूण औषध निर्माता (फार्मासिस्ट) | एकूण परिचारीका | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ३१ | ३१ | ३१ | ४२ | १३५ |
| २ | अकोला | १० | १० | १० | १९ | ४९ |
| ३ | अमरावती | १६ | १६ | १६ | ३२ | ८० |
| ४ | अहमदनगर | ४५ | ४५ | ४५ | ६१ | १९६ |
| ५ | बीड | २६ | २६ | २६ | ३९ | ११७ |
| ६ | भंडारा | ८ | ८ | ८ | १६ | ४० |
| ७ | बुलढाणा | १९ | १९ | १९ | ३३ | ९० |
| ८ | चंद्रपुर | ९ | ९ | ९ | २४ | ५१ |
| ९ | धुळे | २३ | २३ | २३ | २९ | ९८ |
| १० | गडचिरोली | ४ | ४ | ४ | १६ | २८ |
| ११ | गोंदिया | १० | १० | १० | १८ | ४८ |
| १२ | हिंगोली | ११ | ११ | ११ | १७ | ५० |
| १३ | जालना | ३४ | ३४ | ३४ | ४३ | १४५ |
| १४ | जळगाव | २१ | २१ | २१ | ३८ | १०१ |
| १५ | कोल्हापुर | २८ | २८ | २८ | ४२ | १२६ |
| १६ | लातुर | २० | २० | २० | ३० | ९० |
| १७ | नागपुर | २१ | २१ | २१ | ३६ | ९९ |
| १८ | नांदेड | २५ | २५ | २५ | ४३ | ११८ |
| १९ | नंदुरबार | १५ | १५ | १५ | २२ | ६७ |
| २० | नाशिक | ५१ | ५१ | ५१ | ७३ | २२६ |
| २१ | उस्मानाबाद | ११ | ११ | ११ | २० | ५३ |
| २२ | परभणी | ११ | ११ | ११ | २१ | ५४ |
| २३ | पुणे | ४८ | ४८ | ४८ | ६६ | २१० |
| २४ | रायगड | १२ | १२ | १२ | २८ | ६४ |
| २५ | रत्नागिरी | ११ | ११ | ११ | २० | ५३ |
| २६ | सांगली | २० | २० | २० | ३२ | ९२ |
| २७ | सातारा | २४ | २४ | २४ | ३६ | १०८ |
| २८ | सिंधुदुर्ग | २ | २ | २ | १० | १६ |
| २९ | सोलापुर | ३७ | ३७ | ३७ | ५२ | १६३ |
| ३० | वर्धा | ५ | ५ | ५ | १२ | २७ |
| ३१ | वाशिम | ९ | ९ | ९ | १७ | ४४ |
| ३२ | यवतमाळ | १८ | १८ | १८ | ३५ | ८९ |
| | **एकुण** | **६३५** | **६३५** | **६३५** | **१०२२** | **२९२७** |

**सूचना :-**

१. ही पदे राज्यशासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत.
२. पदांची संख्या जिल्हयाच्या गरजेप्रमाणे बदलण्याची शक्यता आहे.
३. प्रत्येक पदासाठी प्रतिक्षायादी करण्यात येणार आहे.
४. पदांसाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.
५. उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.
६. निवड झालेल्या उमेदवारांस सुरुवातीला ११ महिन्यांच्या कालावधीसाठी नेमणूक दिली जाईल.
७. उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज, मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित सत्यप्रतीसह थेट मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.
८. अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.
९. मुलाखतीत निवड झालेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण संबंधित जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे मार्फत मार्च, २०१३ मध्ये आयोजित करण्यात येईल. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या उमेदवारांनाच दि. १ एप्रिल, २०१३ पासून नियुक्ती देण्यात येईल.

**१०.अर्जदाराने अर्ज A4 आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असाव्यात.**

**अ) उमेदवाराची सर्व साधारण माहिती -**

१) अर्ज केलेल्या पदाचे नांव २) ठळक अक्षरात स्वत:चे नांव ३) अर्जदाराचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य) ४) कामाचा अनुभव - काम केलेली संस्था, धारण केलेले पद, कालावधी, पदाची जबाबदारी व वेतन ५) शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशिल - अभ्यासक्रमाचे नांव, संस्था, विद्यापीठाचे नांव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणांची टक्केवारी इ.

**ब) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती व मुळ कागदपत्रे -**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला.

३) अनुभवाची प्रमाणपत्रे. ४) पासपोर्ट आकाराचे २ फोटो.

**११.पदनिहाय मुलाखतीची तारीख खालील प्रमाणे राहील.**

**१)** वैदयकिय अधिकारी (महिला)- मुलाखतीचा दिनांक २५/०२/२०१३ वेळ सकाळी ९:०० वाजता.

स्थळ - संबंधित जिल्हयाचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे कार्यालय.

**२)** वैदयकिय अधिकारी (पुरुष)- मुलाखतीचा दिनांक २६/०२/२०१३ वेळ सकाळी ९:०० वाजता.

स्थळ - संबंधित जिल्हयाचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे कार्यालय.

**३)** परिचारीका (ANM)- मुलाखतीचा दिनांक २७/०२/२०१३ वेळ सकाळी ९:०० वाजता.

स्थळ - संबंधित जिल्हयाचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे कार्यालय.

**४)** औषध निर्माता - मुलाखतीचा दिनांक २८/०२/२०१३ वेळ सकाळी ९:०० वाजता.

स्थळ - संबंधित जिल्हयाचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे कार्यालय.

१२) अर्जदाराने राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई येथे अर्ज पाठवू नये. त्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**आयुक्त (कुटुंब कल्याण) व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,**
**३ रा मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.**